ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# सिन्नर तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील योगदान

**प्रिती मुरलीधर बैरागी[1], डॉ. आशालता सोनवणे[2]**

*[1]संशोधक विद्यार्थी, संशोधन केंद्र, के.आर.टी.कला.बी.एच.वाणिज्य आणि ए.एम.विज्ञान ( K.T.H.M. ) महाविद्यालय , नाशिक*

*[2]संशोधक मार्गदर्शक, संशोधन केंद्र, के.आर.टी.कला.बी.एच.वाणिज्य आणि ए.एम.विज्ञान ( K.T.H.M. ) महाविद्यालय , नाशिक*

***Corresponding Author:* प्रिती मुरलीधर बैरागी**

**DOI - 10.5281/zenodo.14881011**

**सारांश:**

*भारतीय शेती व शेती व्यवसाय हा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर कायमच अर्थव्यव्स्थेचा कणा आहे.भारत हा कृषीप्रधान देश आहे.आज शेती हा व्यवसाय वेल्थ क्रीएटर म्हणून ओळखला जातो.शेतकरी १०० बी लावतो. सूर्यप्रकाश व खते पाणी यांच्या सहाय्याने लाखो किलो धान्य तयार करतो. म्हणजे खऱ्या अर्थाने हा व्यवसाय वेल्थ क्रिएटर होतो आहे. त्यातही हवामानावर तसेच पर्जन्यमानावर भारतीय कृषी अवलंबून आहे .सिन्नर तालुक्यामध्ये पूर्व भाग दुष्काळी तर पश्चिम भागामध्ये बऱ्यापैकी पर्जन्यमान आहे. शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये शेतकऱ्यांच सहभाग आणि आर्थिक विकासातील योगदान यावर हा अभ्यास केलेला आहे. शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग आणि आर्थिक विकासातील योगदान यावर हा अभ्यास केलेला आहे.*

**प्रस्तावना:**

शेती हा व्यवसाय परंपरागत दृष्टिकोनातून केला जात आहे. त्यात व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. विशिष्ट शेतमाल उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी उत्पादक कंपनी या नावाची संकल्पना "ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. योगेन्द्र कुमार" यांच्या अध्यक्षते खाली स्थापन झालेल्या समितीने १९९९ साली मांडली. या समितीने सहकारातील सकारात्मक बाबी व खाजगी कंपनीतील चांगल्या बाबींचा संकर करून उत्पादक कंपनी शेतकरी गट अथवा स्वारस्य घटकांनी एकत्रित येऊन स्थापना करावी अशी मांडणी केली. त्यानुसार १९५६ च्या कंपनी कायद्यात २००२ साली दुरुस्ती करण्यात आली सेक्शन ५८१ जी नुसार राज्य सरकारच्या कंपनी सेक्रेटरी कार्यालय, पुणे येथे उत्पादक कंपनी स्थापन होण्यास सुरवात झाली.

**शेतकरी उत्पादक कंपन्यांचा अर्थ:**

**"एकाच वस्तीतील एकाच शेतमालाचे उत्पादन घेणाऱ्या साधारणपणे सारखी आर्थिक, सामाजिक परिस्थिती असलेल्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या गटाला शेतकरी गट असे म्हणतात." असे अनेक गट एकत्र येऊन शेतकरी उत्पादक कंपनी निर्माण करता येते.**

**मुख्य उद्दिष्टे:**

१) शेतकऱ्यांच्या शेतीमालाला चांगले बाजारभाव मिळवून देणे.
२) प्रक्रिया आणि साठवणुकीसाठी तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे.
३) शेतकऱ्यांना थेट बाजारपेठांशी जोडणे.

**शेतकरी उत्पादक कंपन्यांची प्रमुख उदाहरणे:**

१) **सह्याद्री फार्म्स (नाशिक):** भारतातील सर्वात मोठ्या शेतकरी उत्पादक कंपन्यांपैकी एक, जी मुख्यतः फळ आणि भाजीपाला निर्यात करते.

२) **स्वरूप FPC (औरंगाबाद):** सेंद्रिय धान्य आणि प्रक्रिया उत्पादनामध्ये प्रसिद्ध.

३) **पैठण तालुका शेतकरी उत्पादक कंपनी (औरंगाबाद):** धान्य आणि सेंद्रिय उत्पादनांवर लक्ष केंद्रित.

**सिन्नर तालुक्यातील काही शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये सहभागी शेतकऱ्यांना होणारा फायदा:**

या अभ्यासाचा उद्देश सिन्नर तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये सहभागी शेतकऱ्यांना होणारे फायदे समजावून घेणे आणि त्याचा आर्थिक विकासावर होणाऱ्या प्रभावाचा आढावा घेणे आहे.

**पद्धतशास्त्र :**

**प्राथमिक डेटा:** सिन्नर तालुक्यातील ३ शेतकरी उत्पादक कंपन्यातील प्रत्येकी २ सदस्य शेतकऱ्यांची प्रत्यक्ष मुलाखत व प्रश्नावली घेण्यात आली. त्यांच्या उत्पन्नातील वाढ, उत्पादन खर्चातील बचत, आणि बाजारपेठेतील सहभागाबाबत माहिती गोळा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या गरजा, अडचणी, आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कामकाजावर त्यांचे मत जाणून घेण्यात आले. शेतकऱ्यांचे गट तयार करून त्यांच्यासोबत शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या उपक्रमांमुळे झालेल्या आर्थिक फायद्यांवर चर्चा करण्यात आली.

**द्वितीयक डेटा :** सिन्नर तालुक्यातील **'युवा मित्र'** ही सामाजिक संस्था शेतकरी उत्पादक कंपन्यांसोबत कार्यरत आहे.या संस्थे कडून माहिती घेण्यात आली. महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, व नाबार्ड सारख्या संस्थांनी सिन्नर तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांन बद्दल केलेल्या अहवालांचा अभ्यास करण्यात आला. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या नोंदींमधून वार्षिक उत्पादन, विक्री, नफा, व शेतकऱ्यांना दिलेल्या लाभांची माहिती गोळा करण्यात आली. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून उत्पादने कोणत्या बाजारपेठेत विकली जातात, त्यांची मागणी, व स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजाराशी संबंध कसा येतो यावर अभ्यास करण्यात आला .

सहभागी शेतकऱ्यांना झालेला फायदा शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थितीचा गुणात्मक व विश्लेषनात्मक अभ्यास करण्यात आला.

**विश्लेषण:**

शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये सहभागी शेतकऱ्यांना तांत्रिक फायदे पण झालेत. प्रशिक्षणामुळे शेतीत तंत्रज्ञानाचा वापर वाढला. आधुनिक यंत्रसामग्री व साठवणुकीसाठी लागणाऱ्या सुविधा प्राप्त झाल्या. शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये सहभागी शेतकऱ्यांना काही सामाजिक फायदे झाले. गावपातळीवर एकत्रित प्रयत्नामुळे सामाजिक एकोपा वाढला. महिलांना रोजगार व नेतृत्वाची संधी मिळाली. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सामुहिक विक्री प्रक्रियेने बाजारभाव चांगला मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढलेले आढळून आले. शेतकरी उत्पादक कंपन्यांन मधून शेतकऱ्यांना सहज कर्ज सुविधा उपलब्ध झाली, ज्यामुळे त्यांचा आर्थिक ताण कमी झाला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, पीक व्यवस्थापन, आणि प्रक्रिया उद्योगांबाबत प्रशिक्षण दिले गेले , ज्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ झाली.

**निष्कर्ष:**

शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये सहभागी झाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदे मिळाले.

उत्पादनासाठी लागणाऱ्या निविष्ठा कमी दरात मिळाले. उत्पादन थेट बाजारात विकल्यामुळे अधिक नफा प्राप्त झाला. बाजारपेठेत मालाचा चांगला दर मिळाला. उत्पन्नवाढीचा प्रभाव दिसून आला. शेतकरी उत्पादक कंपनीद्वारे खते, बी-बियाणे, आणि यांत्रिकी साधने घाऊक दराने उपलब्ध केल्यामुळे उत्पादन खर्च कमी झाला व शेतकऱ्यांची आर्थिक मिळकत वाढली. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सदस्य शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न पूर्वीच्या तुलनेत २० ते ३० % पर्यंत वाढल्याचे आढळून आले आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले आणि वरचेवर होणाऱ्या अडचणी कमी झाल्या. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बाजारपेठेत थेट प्रवेश मिळाला, ज्यामुळे मध्यस्थांचे प्रमाण कमी होऊन नफा थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला.

प्रत्यक्ष मुलाखती दरम्यान काही अडचणी आढळून आल्या. शेतकरी उत्पादक कंपनीकडे व्यवस्थापन कौशल्याचा अभाव दिसून आला. काही शेतकऱ्यांनी वित्तीय पाठबळाची कमतरता सांगितली. अजूनही शेतकऱ्यांमधील कंपनीविषयी जागरूकतेचा अभाव दिसून आला.

**संदर्भ:**

१) व्ही. पद्मानंद, खोडवेकर सुशील, सूद कुणाल, (१०१८) 'शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी उद्योजकता आणि व्यस्थापन संहिता, Maharashtra Agricultural Competitiveness Project प्रकाशन, पुणे. पान क्र.१.

२) देसाई बाळासाहेब, शेतीतील संधी, लोकसत्ता,३ जानेवारी २०२५